|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)**

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

# तिसाव्या दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने सर्व पीएच.डी. पदवीधारक विद्यार्थ्यांना सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा तिसावा दीक्षांत समारंभ **माननीय श्री. भगत सिंह कोश्यारी, राज्यपाल (महाराष्ट्र राज्य) तथा कुलपती कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक २४ मे, २०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास अतिथी म्हणून **मा. ना. श्री. उदयजी सामंत,** उच्च व तंत्रशिक्षण मंत्री (महाराष्ट्र राज्य), **मा.ना. श्री. गुलाबरावजी पाटील,** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री जळगाव जिल्हा आणि **मा. ना. अब्दुलजी सत्तार,** महसूल, ग्रामविकास बंदरे, खार जमिनी विकास, विशेष सहाय्य राज्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री धुळे जिल्हा हे उपस्थित राहणार आहेत. तसेच **मा. डॉ. भूषण पटवर्धन, चेअरमन, नॅशनल ॲसेसमेंट ॲन्ड ॲक्रिडेशन कौन्सिल (NAAC) बेंगलोर** हे आभासी पध्दतीने (Online) सहभागी होणार असून, दीक्षांत भाषण करणार आहेत.

त्या अनुषंगाने तिसाव्या दीक्षांत समारंभासाठी ज्या पीएच.डी. पदवीधारक विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केले असतील त्यांनी मंगळवार, दिनांक २४ मे, २०२२ रोजी सकाळी ०७.३० ते ९.३० व दुपारी १२.३० ते ४.३० दरम्यान विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत तळमजल्यावरील कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय कक्ष क्र.१२९ मधील खिडकी क्र. ११ वरील प्रमाणपत्र वितरण केंद्रावरुन स्वीकृत करावेत.

तसेच मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, दीक्षांत समारंभाचे अतिथी व प्र.अधिष्ठाता यांच्या समवेत मंगळवार, दिनांक २४ मे, २०२२ रोजी समारंभाची सांगता झाल्यानंतर सर्व पीएच.डी. पदवीधारकांचे सामुहिक छायाचित्र (Group Photo Session) घेण्याचे आयोजित केले आहे. तेव्हा, सर्व संबंधितांनी नियोजीत वेळेत दीक्षांत सभागृहाच्या मंचावर उपस्थित राहावे.

**पीएच.डी. पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी पोशाख खालीलप्रमाणे**:-

(१) **विद्यार्थी**:- पांढ-या रंगाचा शर्ट, पांढ-या रंगाची पॅन्ट किंवा पांढ-या रंगाचा नेहरु शर्ट आणि पांढ-या रंगाचा चुस्त पायजमा.

(२) **विद्यार्थीनी**:- लाल किनार असलेली पांढरी साडी, लाल रंगांचे ब्लाऊज किंवा लाल रंगाचा कुर्ता (कमीज) व पांढ-या रंगाची सलवार.

**(प्रा. दिपक श. दलाल)**
प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दिनांक १४.०५.२०२२